# होमगार्ड संघटना

## निष्काम सेवा

# इतिहास

६ डिसेंबर १९४६ :- होमगार्ड संघटनेची स्थापना.
पहिले समादेशक. श्री.एन.एम.कामटे D.C.P.

१९४७ :- पहिले मानसेवि समादेशक.
ले. कर्नल.श्री.ए.बी. गजेंद्रगडकर

होमगार्ड मध्ये सुसूत्रता, शिस्त येण्यासाठी १९४७ साली महाराष्ट्र गृहरक्षक अधिनियम अमलात आला

१९४८ :- प्रत्येक जिल्हयांचे ठिकाणी मानसेवि जिल्हा समादेशक तालूका समादेशक, प्रभारी अधि, आणि पथके व उपपथके निर्माण केली .

१९४९ :- कॅप्टन.एम.जे.बी.मानेकजी पहिले महासमादेशक

१९५० :- महिला तुकडीची स्थापना केली.

१९५३ :- प्रगत प्रशिक्षण देण्याकरीता मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था होमगार्ड ची स्थापना झाली.

१९५६ :- द्वी भाषिक मुंबई राज्या ची स्थापना झाली.

१९५९ :- युनियन होम मिनिस्टर श्री.पंडित गोविंद वल्लभभाई पंत यांनी १० सष्टेंबर,१९५९.रोजी दिल्ली मध्ये घोषणा केली की मुंबई च्या धर्तीवर संपूर्ण भारतामध्ये होमगार्ड संघटनेची स्थापना करावी. (क्रॉस मैदान येथिल भेट )

१ मे,१९६०. :- गुजरात आणि महाराष्ट्र राज्य स्थापन झाले.

२९ नोव्हें,१९६१. :- महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्री. यशवंत बी.चव्हाण यांनी मुल्यमापन समिती स्थापन केली.

| | |
|---|---|
| १) श्री. के.एम.करीअप्पा | अध्यक्ष |
| २) श्री. बी.डी.देशमुख | सदस्य |
| ३) श्री. के.एल. पंजाबी | सदस्य |

६ जाने,१९६२. :- मुल्यमापन समिति ने अहवाल सादर केला.

३० सष्टें,१९६१. :- कॅप्टन एम.जे.बि. मानेकजी यांचे निधन झाले.

१५नोव्हें,१९६१. :- ब्रिगेडियर बी.जी. देऊस्कर यांची महासमादेशक म्हणून नेमणूक झाली.

५ डिसें १९७१ :- होमगार्ड संघनेला २५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे सिल्व्हर जुबली साजरी करण्यात आली. त्या प्रसगी महाराष्ट्र राज्याचे गव्हर्नर श्री. अलियावर जंग यांनी महाराष्ट्र राज्य होमगार्डना कलर ध्वज प्रदान केला. फिकट निळया रंगाच्या कापडावर सोनेरी धाग्याने विणलेले कबूतर आणि त्याला लॉरेल जाळीचा घेर .

१९७१ :- पासून राज्य सरकारने ५० %तत्वावर अखिल भारतिय होमगार्ड कार्य प्रणाली स्वीकारली

१९७६ :- जिल्हा प्रशिक्षण केंद्राची स्थापना झाली, व पदस्थापना झाली.

- महाराष्ट्र राज्य होमगार्ड ची लक्ष संख्या ५३,८५६ असून ४४,१०० होमगार्ड कार्यरत आहेत.
- गेल्या सहा वर्षात २९ पुरूष व 3 महिला होमगार्डनी कर्तव्य बजावित असताना हौतात्म्य पत्करले आहे.
- हिरक महोत्सविवर्ष २००६ मध्ये महाराष्ट्र शासनाने देशात प्रथमच या प्रसंगी राज्यातीलसर्व होमगार्डना महाराष्ट्र राज्य होमगार्ड हिरक महोत्सवी पदक (विशेष पदक)जाहिर केले व प्रत्येक होमगार्ड स्वयंसेवकांना पूर्ण गणवेष संच मंजूर केला.

- सुरत व श्रीलंका पूरपरिस्थितीत दुर्घटनांच्यावेळी होमगार्ड ने तत्परतेने साहाय्य केलेले आहे.
- १९६१ मध्ये पानशेत धरण फुटल्यामुळे पुणे शहरात अनेक पूरग्रस्तांचे प्राण वाचविले.
- १९७२ – १९७३ मध्ये अखिल भारतीय रेल्वे कर्मचारी संप काळात कर्तव्य पार पाडले.
- १९७७ मध्ये मुंबई महानगर पालिका कर्मचाऱ्यांचा व अग्निशमन दलाच्या संप कालावधीत जवळजवळ साडेतीन महिने सर्व अत्यावश्यक सेवा अखंडित चालू ठेवण्याचे योगदान होमगार्डनी दिले.

- सन १९९३ साली लातूर - उस्मानाबाद येथे झालेला भूकंप,
- सन १९९९ साली ओरिसामध्ये आलेले चक्रीवादळ,
- सन २००१ साली भूज – गुजरातमध्ये झालेला भूकंप,
- सन २००४ साली अंदमान – निकोबार येथे झालेला त्सुनामी

अशा नैसर्गिक आपत्ती ओढावलेल्या ठिकाणी जाऊन पीडित आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन करण्यसचे मोलाचे कार्य महाराष्ट्रातील होमगार्ड पथकाने अत्यंत सचोटीने केले आहे.








CoreyKoberg.com

- मुंबईमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक रेल्वे स्टेशनवर महीला व पुरुष होमगार्ड कर्तव्यावर तैनात आहेत.
- राज्यात नव्याने होमगार्ड्सची सुरक्षा सेवा प्रथम ९ जिल्यात व टप्याटप्प्याने संपूर्ण महाराष्ट्रात कार्यान्वित होणार आहे.
- सध्या O.N.G.C., एअरपोर्ट, मुंबई पोर्ट ट्रस्ट,भारतिय खाद्य निगम, मुंबई महानगरपालिका यांना मागणी प्रमाणे होमगार्ड कर्तव्यावर देण्यात येतात.

- मानसेवी होमगार्ड अधिकारी / होमगार्ड यांना वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीबाबत या संघटनेकडून त्यांना रोख बक्षिसे, पदक अथवा प्रशंसापत्रे बहाल केली जातात. याशिवाय त्यांना राष्ट्रपती यांचे मार्फत गुणवत्तापूर्ण सेवा पदक व वैशिष्ट्यपूर्ण पदक बहाल करुन सन्मानित करण्यात येते.
- गेल्या ४० वर्षामध्ये १६१ होमगार्ड अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पदके प्रदान करुन गौरविण्यात आले आहे.

## उद्दिष्ट

- जनतेची सेवा करावी या भावनेने प्रेरित होऊन गृह आघाडीचे संरक्षण करण्यासाठी आपला काही वेळ व शक्ती खर्च करु इच्छिणा-या नागरिकांना संधी देणे हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे.

- होमगार्ड म्हणजे आपल्या नेहमीच्या कामाच्या वेळेव्यतिरिक्त इतरवेळी प्रशिक्षण घेण्यासाठी स्वच्छेने पुढे येणारा आणि सरकारकडुन वेळोवेळी सोपविण्यात येणा-या जबाबदा-या स्विकारणारा एक नागरिकच असतो.

## होमगार्ड संघटनेत स्वयंसेवकांची भरती करणे:

होमगार्ड संघटनेतील सदस्याची निवड/भरती काळजी पुर्वक केली जाते.वैद्यकीय तपासणीत शारिरिकदृष्टया लायक असलेल्या,विहित वयोमर्यादेच्या आतील असलेले व किमान शैक्षणिक अर्हता धारण करणारे व ज्या उमेदवाराचे चारित्र्य व पूर्वचारित्र्य यांची पोलीसांकडून पडताळणी केली आहे आणि त्यांच्याविरुध्द कोणतेही प्रतिकूल प्रतिवेदन करण्यात आलेले नाही अशा या राज्यात रहाणा-या कोणत्याही भारतीय नागरिकाला होमगार्ड संघटनेत भरती करुन घेता येते.

## अर्जांचे नमुने

हे अर्जाचे नमुने राज्य सरकारकडुन ठरविण्यात आले आहेत. (नमुना अ नियम ४ नुसार विशेष-महा.स.१ म)

शिक्षण :- कोणत्याही भाषेतील दहावी इयत्तेची परिक्षा तो उत्तीर्ण असावा.

वय :- १८ ते ५० वर्षे वय पुर्ण असावे.

अर्जाचा नमुना हा अर्जदारास कामावर ठेवणा-या इसमामार्फत पाठविला गेला पाहिजे

* होमगार्ड सदस्याचा पदावधी हा (३ वर्षाचा) असेल तो

* जेंव्हा जेंव्हा आवश्यक असेल तेंव्हा तेंव्हा व कोणत्याही मुदतीसाठी शिक्षण घेण्याकरिता अथवा कर्तव्य बजावण्याकरिता त्यांना हजर रहावे लागेल.

होमगार्डचा सदस्य म्हणून नियुक्तीचे प्रमाणपत्र (नियम ७ प्रमाणे नमुना क मध्ये) देण्यात आले पाहिजेत.

ओळखपत्रिका :- स्वयंसेवकांचे शिक्षण पुरे झाल्यावरच देण्यात येतात.

## होमगार्ड स्वयंसेवकाची कामे व कर्तव्ये

अ] नैसर्गिक आपत्तीच्या वेळी, नागरी आणीबाणी संघटनेचे केंद्रक म्हणून मदत करणे.

ब] आग,बचाव,दळणवळण व रुग्णांची वाहतूक यासारख्या नागरी सरंक्षण सेवांचे केंद्रक म्हणून काम करणे.

क] परिवहन,दळणवळण,वीज,पाणीपुरवठा व इतर आवश्यक सेवा यात बिघाड झाल्यास त्याकामी मदत करणे.

ड] कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामी पोलीसांना मदत करणे.

इ] शासनाच्या समाजकल्याणच्या योजनांस सहाय्य करणे.

ई] राज्य शासनाकडुन किंवा महासमादेशकांकडुन वेळोवळी नेमून देण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे.

### ध्वजचिन्ह

लॉरेल फुलांच्या मालेने वेष्टित कबुतर हे महाराष्ट्र राज्यातील ध्वजचिन्ह आहे.

### ध्वज

फिकट निळया रंगाच्या कापडावर मध्यभागी सोनेरी धाग्याने भरलेले कबुतर हा नगरसेना संघटनेचा ध्वज आहे.

### रचना – चिन्हे

राज्यातील महासमादेशक पसंत करून देतील.

**संघटनेच्या कार्याचे नियतकालिक समालोचन आणि कार्य जास्त कार्यक्षमतेने व्हावे म्हणून सल्लागार समिति स्थापन केल्या**

## मध्यवर्ति सल्लागार समिति

1) मुख्य मंत्री व गृहमंत्री ( अध्यक्ष )

2) वित्तमंत्री

3) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

4) सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

5) पोलिस महानिरीक्षक, महाराष्ट्र शासन.

6) महासमादेशक, होमगार्ड संघटना, महाराष्ट्र शासन.

7) राज्य शासन वेळोवेळी नेणूक करील अशा चारपेक्षा जास्त नसलेल्या अशासकीय व्यक्ती.

महासमादेशक समितीचे सचिव म्हणून काम पाहतील

## जिल्हा सल्लागार समिति

१) जिल्हाध्यक्ष ( अध्यक्ष ).

२) जिल्हा पोलिस अधिक्षक.

३) जिल्हा समादेशक नगरसेना संघटना.

४) राज्य शासनाने नेमणूक करावयाच्या ३ ते ७ अशाकीय व्यक्ती

जिल्हा समादेशक, नगरसेना संघटना, हे या समितीचे सचिव म्हणून काम पाहतील.




## कंपनीची रचना

| | HG | ASL | SL | SGT | CQMS | CSM | RUNER | PC | SPC | CC | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SEC | 9 | 1 | 1 | - | - | - | - | - | - | - | **11** |
| PLT | 27 | 3 | 3 | 1 | - | - | - | 1 | - | - | **35** |
| COM | 81 | 9 | 9 | 3 | 1 | 1 | 1 | 3 | 1 | 1 | **110** |

| | HG | NCO | OFF | TOTAL |
|---|---|---|---|---|
| SEC | 9 | 2 | - | **11** |
| PLT | 27 | 7 | 1 | **35** |
| COM | 81+1 | 23 | 5 | **110** |

# हुद्दे दर्शविणारे बिल्ले

**बिल्ले** **धारण करणारे**
**अधिकारी**

१) एकमेकांना छेदून जाणारा दंडा आणि तलवार मुख्य महासमादेशक IPS(D.G.) आणि कबुतर

२) एकमेकांना छेदून जाणारा दंडा आणि तलवार महासमादेशक IPS(D.G.) आणि मेपल झाडाचे एक पान.

3) तीन मेपल झाडाची पाने आणि कबुतर उप महासमादेशक IPS(A.D.G.)

४) कबुतर आणि मेपल झाडाची दोन पाने समादेशक / जिल्हा समादेशक

५) कबुतर आणि मेपल झाडाचे एक पान. वरिष्ठ दलसंभाग नायक

६) कबुतर दलसंभाग नायक

७) मेपल झाडाची तीन पाने. कंपनी नायक

---

**बिल्ले** **अनायुक्त अधिकारी**

१) एकमेकांना छेदून जानारे तांबडे पट्टे आणि कबुतर रेजिमेंटल सार्जंट मेजर

२) एकमेकांना छेदून जानारे तांबडे पट्टे रेजिमेंटल सामग्री प्रबंधक सार्जंट आणि दोन चक्रे

३) एकमेकांना छेदून जानारे तांबडे पट्टे कंपनी सार्जंट मेजर आणि एक चक्र

४) एकमेकांना छेदून जानारे तांबडे पट्टे कंपनी सामग्री प्रबंधक

५) तीन सरळ तांबडे पट्टे सार्जंट

६) दोन सरळ तांबडे पट्टे उप विभाग नायक

७) एक सरळ तांबडा पट्टा सहाय्यक उप विभाग नायक

- महासमादेशक नेमून दिलेल्या बिल्यांव्यतिरिक्त पीक कॅप भोवती निळी फित आणि कॉलरवर 'कॉलर पॅचेस' धारण करील.

## प्रशिक्षण

१) प्राथमिक प्रशिक्षण

२) उजळणी प्रशिक्षण

३) प्रगत प्रशिक्षण

४) नेतृत्व प्रशिक्षण

### होमगार्ड चे प्रकार

१) शहरी होमगार्ड (पुरुष व महिला )

२) ग्रामीन होमगार्ड (पुरुष )

३)सीमा दल होमगार्ड

## प्रशिक्षण

१) प्रथमिक प्रशिक्षण :- ३५ दिवसांचे शिबीर

२) उजळणी प्रशिक्षण :- ८ दिवसांचे शिबीर

**प्रगत प्रशिक्षण** :- प्राथमिक प्रशिक्षण व उजळणी प्रशिक्षण पुर्ण केल्या नंतर (C.T.I.) येथे २१ दिवसांच्या शिबीरा करीता प्रवेश दिला जातो.

**नेतृत्व प्रशिक्षण** :- (म.प्र.सं.)येथे २१ दिवसांचे शिबीर (N.C.O.) करीता आणि (P.C.to C.C.) अधिकारी यांचे करीता ३० दिवसाचे शिबीर असते.

**अखिल भारतीय स्तरावर प्रशिक्षण**

## होमगार्ड चे कल्याण

### भत्ते

**कर्तव्य भत्ता** :- ५७० रुपये

**उपहार भत्ता** :- १०० रुपये आणि

**प्रशिक्षण कालावधित भोजन भत्ता** :- १०० रुपये

**खिया भत्ता** :- ३५ रुपये

**कवायत भत्ता** :- ९० रुपये

प्रवास भत्ता नियमा प्रमाणे

महारष्ट्र होमगार्ड कल्याण व लोक हितेषी निधी मधून कर्तव्य बजावताना अथवा प्रशिक्षण घेत असताना अपघत / मत्यू पावल्यास वारसांना आर्थिक सहाय्य

| होमगार्ड ची सेवा | वित्तीय सहाय्य |
|---|---|
| ३वर्षे सेवा पूर्ण | रु.२०,०००/- |
| ६वर्षे सेवा पूर्ण | रु.४०,०००/- |
| ९वर्षे सेवा पूर्ण | रु.६०,०००/- |
| १३वर्षे व त्यावरील सेवा | रु.७५,०००/- |

शासन निर्णय कर्तव्यावर असताना मत्यू पावल्यास २,००,००० रुपये वारसांना आर्थिक सहाय्य

# "कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन"

या वचनाप्रमाणे होमगार्ड कोणत्याहि फळची अपेक्षा न करतास्वार्थत्यागाची वृत्ती दाखवून नेहमी संकटकाळात आपदग्रस्तांना साहाय्य करतात, तसेच शासनासही मदत करतात.


Any Questions


धन्यवाद